# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा संरक्षणाचे कायदे

**डॉ.संभाजी सोपानराव दराडे**
इतिहास विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सोनई ता.नेवासा जि.अ.नगर - ४१४१०५
sambhajidarade333@gmail.com

### १) प्रस्तावना :

राजसत्तेचा वापर जनकल्याणासाठी करावयाचा असतो अशा प्रकारचा आदर्श राजर्षी शाहू महाराजांचे महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या समाज विकासाच्या क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्वपूर्ण असे आहे. छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेली शौर्याची लोककल्याणकारी राज्याची परंपरा राजर्षींनी पुढे चालू ठेवली. तत्पूर्वी गेली शेकडो वर्ष आपल्या देशाची संस्कृती ही कट्टर पुरुष प्रधान होती, आणि अदयापहि ती थोड्या फार फरकाने तशीच आहे. त्यामध्ये समस्त स्त्री-पुरुषप्रधान समाजांत रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धाचा पगडा असल्यामुळे स्त्रियांवर सतत अन्याय होत होते. डॉ. पवार म्हणतात, बालविवाह, विधवाविवाह प्रतिबंध इ. रूढी परंपरांनी स्त्रीचे जीवन असहाय व पुर्णपणे परावलंबी बनले होते.[१] स्त्रीयांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम महात्मा फुले यांच्या पासून प्रिन्सिपल आगरकरांपर्यंत अनेक सुधारकांनी केले होते. स्त्रियांच्या ठिकाणी आत्मजागृतीचे सामर्थ्य यावे तसेच निर्भयता व स्वाभिमान निर्माण व्हावा म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले, शिवाय तिच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणारे अनेक कायदे केले व तिची समाजाकडून व कुटुंबाकडून होणारी पिळवणूक थांबविण्याचे अनेक प्रयत्न केले.

### २) अभ्यासाचा समाज शास्त्रीय दृष्टीकोण :

स्त्रियांच्या समाजातील स्थानाचा संबंध हा सामाजिक चळवळीशी व परिवर्तनाशी निगडीत असतो त्याची काही कारणे खालीलप्रमाणे :

१. सामाजिक व्यवस्थेत बदल घडून आणण्याचे सामर्थ्य महिलांच्या शक्ति मध्ये असते.[२]
२. सामाजिक वातावरणातील बदलामुळे परिवर्तन घडते.[३]
३. परिवर्तन हे सभोतीच्या पूरक वातावरणातून घडते. त्यासाठी महिलांना सक्रियपणे अभ्यास करणे योग्य ठरेल. समाजाच्या स्वास्थासाठी स्त्री-वर्गाच्या संरक्षणविषयक कायदेशीर मान्यता असणे ही अत्यंत अवशक बाब आहे.

### ३) सामाजिक संरक्षण विषयक कायदे :

#### १. विधवा-पुनर्विवाह कायदा :

मागासलेल्या समाजात स्वातंत्र्य होते. मात्र स्वत:ला श्रेष्ठ वर्णीय व सुसंस्कृत समजल्या जाणार्या जातीमध्ये विधवांना पुनर्विवाह करता येत नव्हता.शिवाय त्यांना केशवपण सारख्या अत्यंत क्रूर रूढीखाली दु:खी व उपेक्षित जीवन जगावे लागत होते. एखाद्याने असा पुनर्विवाह केल्यास त्यास समाज मान्यता नव्हती. तर कायद्याचीही मान्यता नव्हती. अश्या विवाहास बेकायदेशीर ठरवून त्यापासून होणारी संतती ही अनौरस समजली जात होती. राजर्षी शाहू महाराजांनी या अन्यायी रूढीस धक्का ध्यायचे ठरविले. जुलै १९१७ मध्ये त्यांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देण्याचा कायदा मंजूर केला. या कायद्याद्वारे विवाहांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत अनेक अडचणी दूर करण्यात आल्या. एक प्रकारे स्त्री-वर्गावर होणार्या संभाव्य अन्यायाचा प्रतिकार करण्याचे साधन जनतेला उपलब्ध करून दिले गेले.

#### विधवा :

पुनर्विवाह हा आपदधर्म असून समाजाच्या स्वास्थ्यासाठी असे विवाह अत्यंत आवश्यक असल्याचे मत राजर्षींनी १९१९ मध्ये कानपूरच्या कुर्मी - क्षत्रीय परिषदेत व्यक्त केले होते ते म्हणाले, हा आपदधर्म आहे. मनुष्यसमाज निर्दोष राखण्याकरिता हे आहे. वेदशास्त्राचे याला पाठबळ आहे. आमच्या सरकारने विधवा विवाहाचा कायदा पास केला आहे. ज्या जातीमध्ये या आपद्धर्माचा प्रचार नाही. त्या जातीत भ्रूणहत्या, व्यभिचार इ.पापे घडत आहे व हजारो मुले प्रत्येकवर्षी मरत आहेत. ही किती दु:खाची गोष्ट आहे बरे![४] उपरोक्त कुर्मी क्षेत्रीयांच्या सभेत त्यांनी पडदा पद्धतीचा निषेध व तिसरे कोणाशीही मिळून भोजन

ISSN No. 2394-5990

न करणे. क्षत्रीय स्त्रियांनीही राज्याचा गाडा चालवलेला आहे व रणांगणावर जाऊन शत्रू बरोबर लढाया मारलेल्या आहेत हे सर्व काम पडद्यात राहून केवळ अशक्य होते. सध्याही पड्द्याची चाल सर्व देशात नाही. महाराष्ट्र, मद्रास, गुजरात, वगैरे प्रांतात पडदा बिलकुल नाही.[६] राजर्षी छत्रपती शाहू महाराज असेही म्हणतात की, पडद्यामुळे स्त्रियांमधील शूरतादी गुणाचा सर्वथा नाश होतो.[७]

**२. आंतरजातीय विवाह कायदा :**

कोल्हापूर संस्थांनातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांनाही 'जातीनिर्बंध न पाळता सदरहू दोहोपैकी आपआपल्या मुभा' १२ जुलै १९१९ रोजीच्या अंतरजातीय विवाह कायद्याने दिली. या कायद्याच्या एका कलमान्वये विवाहकाली पुरुषाचे वय १८ वर्ष पूर्ण व स्त्रीचे वय १४ पूर्ण असले पाहिजे. असा निर्बंध घातला गेला.[८] इंग्रज सरकारच्या समती वयाच्या कायद्याला अनुसरूनच हा कायदा राजर्षी शाहू महाराजांनी केला होता. यामुळे संस्थानात बाल विवाहाला आळा बसला व स्त्रियांना आंतरजातीय विवाह करण्यास मोकळीक मिळाली. या पार्श्र्भूमीवर विवाह प्रसंगी मुलीचे वय किमान १४ असावे. असे सांगणारा राजर्षी छत्रपती शाहुंचा कायदा इंग्रजांच्या कायद्यापेक्षा आधिक पुरोगामी होता हे स्पष्ट होते. डॉ.जयसिंगराव पवार म्हणतात, या कायद्यानुसार १८ वर्ष पूर्ण झालेल्या स्त्रीला विवाहासाठी पित्याची अथवा पालकाची समती अवशक असणार नाही स्त्रीला आपला जन्माचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देणारे हे मोठे वैशिष्यपूर्ण कलम होते. तसेच या कायद्याने होणार्या विवाहाची रीतसर नोंद करण्यात येणार होती. हा कायदा म्हणजे स्त्री – पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे एक क्रांतिकारक पाऊल होते. या नव्या कायद्यानुसार झालेल्या आंतरजातीय लग्नास कायदेशीर मान्यता देण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी एक खास 'विवाह नोंदणी अधिकारी' नियुक्त केला होता.

**३. क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा :**

अनेक कुटुंबात स्त्रियांचा नवरा व त्यांचे नातलग यांच्याकडून विविध प्रकारचे छळ होत असे. या छळाला प्रतिबंध करण्यासाठी व कोणाताही छळ न्यायदेवतेच्या नजरेतून सुटणार नाही. अशा प्रकारचा सर्व समावेशक कायदा त्यांनी २ ऑगस्ट १९१९ रोजी आपल्या संस्थानात सरकारच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध केला. या कायद्याचे महत्व असे होते की, छळ करणार्या अपराध्याना 'इंडियन पिनल कोड' मधील कलमाच्या मर्यादित आणता येत नसे. या कायद्याची उदीष्टे व कारण स्पष्ट करणारा आपल्या सहीचा एक आदेश जारी केला. या आदेशावरून महाराजांनी कुटुंबामध्ये होणार्या स्त्रियांच्या छळाचा किती बारकाईने अभ्यास केला होता हे स्पष्ट होते.[१०]

सध्याच्या काळात स्त्रियांविरोधी कौटुंबिक हिंसाचाराचा जो कायदा आहे. त्याची बीजे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कायद्यात दिसून येतात. या कायद्याचे महत्व सांगताना राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी म्हटले आहे की, हिंदू शास्त्रकारांनी कुटुंबातील पुढर्यास प्रसंगविशेष हलकेसे शासन करण्याची परवानगी दिली आहे. पण या परवानगीचा दुरुपयोग करून स्त्रियांनी वाटेल अशा वाईट पद्धतीने वागण्याचा आपणास परवनाच मिळाला आहे.[११] पुरुषवर्गाकडून स्त्रियांना होणार्या अत्याचारास आळा घालावा म्हणून हा कायदा करण्यात आला. राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुढे म्हणतात की, अत्यंत त्रासदायक आणि जुलमी वागणूक वरिष्ठ वर्गाच्या लोकांत घडत असली, तरी तिच्या बद्दल केव्हाही तक्रार होत नाही, त्या (स्त्रिया) चार चौघात येत नाहीत किवा आणण्याचा प्रयत्नही केला हात नाही. म्हणून अशी सर्वसाधारण कसोटी आम्ही घालून दिलेली आहे की, त्या योगाने अत्यंत सुधारलेल्या समाजातील क्रूरपणाच्या वागणुकीचे जे प्रकार आहेत. त्याचाही यात समावेश व्हावा[१२] यावरून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी तत्कालीन समाजजीवनचा किती सूक्ष्म अभ्यास केला होता हे स्पष्ट होते. एकूण ११ कलमांच्या या कायद्यामध्ये, स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणार्य अपराध्यास ६ महिन्याचं कारावास व २०० रुपयांतपर्यंत दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद केली गेली होती.

**४) घटस्फोटाचा व वारसाचा कायदा :**

स्त्रियांच्या हक्काचे सरक्षण कसे होईल, घटस्फोटांनंतर तिच्या अन्नवस्त्राच्या खर्चाच्या योग्य ती व्यवस्था कशी होईल. याकडे लक्ष ठेऊन कायद्याची तशी कलमे तयार केली होती. तसेच वैवाहिक संतती असेल, तर त्याच्या ताब्याबद्दलची, पोटगीबद्दलची व शिक्षणाबद्दलची व्यवस्थाही या कायद्याने लावली गेली.[१३] या कायद्यातील एक महत्वाची तरतूद अशी होती की, काही जातीमध्ये जातपंचायतीला घटस्फोटाचे अधिकार होते ते या कायद्याने काढून घेतले गेले. म्हणजे जातपंचायतीच्या लहरीवर आधारलेला, प्रसंगी स्त्रीवर अन्याय करणारा घटस्फोट अमान्य केला गेला. सर्वात महत्वाचे म्हणजे सर्व वर्गाच्या अनौरस संततींना, जनक बापाच्या मिळकतीत वारसा- हक दिला गेला.

या कायद्याच्या उद्देशाबाबत महाराज म्हणतात की, ज्यापेक्षा दरबारच्या प्रजाजनात अनेक जातीमध्ये काडी मोडण्या संबंधाने बरीच ढिलाई आहे. त्यामुळे समाज सर्वस्वी नीती भ्रष्ट होईल व विवाह विधी जो सुधारलेल्या समाजाचा पाया आहे. तो पाया

अजिबात नाहीसा होईल, असे दरबाराचे मत आहे. त्यापेक्षा नवरा व बायको यातील नैतिक हितसंबंध कायद्याच्या मध्यस्थीने काडी– मोड करून घेण्याची त्यास मुभा देऊन दृढतर पायावर उभारण्याचे योजिले आहे. काडी मोडने ही जातीतील पंचांच्या लहरीवर सोडण्याची पडलेली चाल बंद करण्याचे योजिले आहे. ज्यांनी काडी मोडून घेतली आहे, अशा इसमाचा विवाह कायदेशीर करण्याचे आगर कायदेशीर करून घेण्याचे, काडी मोडण्यापूर्वी जन्मलेल्या मुलांचे ताब्यासंबंधी नियम करण्याचे योजिले आहे.[१४] त्यांच्या प्रगतिशील विचारांचे चित्र या कायद्यात रेखाटले आहे. कोल्हापूर गॅझेट मध्ये १७ जानेवारी १९२० रोजी हिंदू वारसा दुरूस्ती कायदा प्रसिद्ध करण्यात आला. या कयद्याची संहिता मराठी व इंग्रजी अशा दोनही भाषेत दिलेली आहे. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी केलेला हा घटस्फोट कायदा उपयुक्त आहे.

**५) देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा :**

तत्कालीन समाजात कनिष्ठ वर्गात देवाच्या नावावर मुली सोडण्याची अनिष्ठ प्रथा मोठ्या प्रमाणावर अस्तीत्वात होती. आजही या प्रथेचे समूळ निर्मूलन झालेले नाही. यातून देवदासींचा वर्ग निर्माण होऊन जोगतीन, मुरली, भाविण इ. प्रकारच्या पतीत स्त्रियांचा दुर्दैवी वर्ग अस्तीत्वात आलेला होता. ही प्रथा हिंदू समाजावरील कलंक होता.[१५] तो दूर करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२० रोजी देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा केला. या कायद्याचे महत्व सांगताना असे म्हटले आहे की, जेव्हा या मुली देवाच्या नावाने सोडली जाते. तेव्हा त्या सर्वार्थाने देवाच्या बनत. जनक घराण्याशी त्याचा काही संबंध राहत नसे. जनक आई बापाच्या मिळकतीत त्याचा काही ही वारसा हक्क राहत नसे. पण त्याचबरोबर देवाला सोडल्यामुळे संबधित देवस्थानात तिला काही परंपरा चालत आलेले विशिष्ट हक्क मिळत असे. त्यांना कायद्याच्या दृष्टीने सामाजिक दर्जाही प्राप्त होत असे. हे हक्क व दर्जा कितीही हीन प्रकारचा असला तरी त्याला समाजाची व परंपरेची मान्यता होती. राजर्षी शाहू महाराजांनी उपरोक्त कायद्याने ते हक्क व दर्जा अमान्य केला. पण त्याचबरोबर या स्त्रियांना आपल्या जनक आईबापाच्या मिळकतीत वारसाचे हक्क प्राप्त करून दिले.[१६] अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी देवदासी प्रथेचा पाया उखडून टाकण्याचा प्रयत्न केला.

**४) राजर्षी शाहू महाराजांच्या कायद्याचे महत्व :**

राजर्षी शाहू महाराजांचे कायदे म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या संरक्षणाचे कायदे होते. स्त्रियांना मिळकतीवरून मुक्त करणे हाच उद्देश होता. कायदे केले म्हणजे स्त्रियांवरील अत्याचार थांबले असे म्हणता येणार नाही कारण आजही अशा प्रकारचे कायदे अस्तीत्वात असून ही स्त्रियांवरील अत्याचारांचे प्रकार थांबलेले नाहीत. राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक महाराष्ट्रातील स्त्रीच्या स्वातंत्र्याचा हक्काचे संरक्षण करणारे कायदे करून आपल्या कारभाराची एक प्रकारे ग्वाही दिली होती.[१७] केवळ कायदा केल्याने स्त्री मुक्त झाली असे नव्हे तर राजर्षी शाहू महाराजांनी या कायद्यासाठी पोषक असे वातावरण तयार केले. त्यामुळे संस्थानात उदारमतवादी विचाराचे वारे वाहू लागले. कायद्याने स्त्रियांवरील अत्याचार थांबले नाहीत पण समाजात एक प्रकारचा धाक निर्माण होऊन लोक प्रगतशील विचाराने वागतील. एका बाजूला कायदे करून दुसर्या बाजूला सामाजिक मन साधण्याचा प्रयत्न केला.

**स्त्री मुक्तिचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज :**

राजर्षी शाहू महाराज हे आधुनिक महाराष्ट्रातील स्त्री मुक्तिचे प्रणेते ठरतात. महात्मा ज्योतीराव फुले यांनी स्त्रियांच्या कल्याणास सुरुवात केली. राजर्षी शाहू महाराजांनी हा विचार पूर्णत्वास नेण्याचे कार्य केले. शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्तीत स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करणारे कायदे करून आपल्या पुरोगामी व लोककल्याणकारी राज्य कारभाराची एकप्रकारे ग्वाहीच दिली होती.[१८] प्रश्न असा आहे कि, केवळ कायदा केल्याने स्त्री मुक्त झाली असे नव्हे, शाहू महाराजांनी या कायद्यासाठी पोषक असे वातावरण तयार केले व संस्थानात उदारमतवादी विचाराचे वारे वाहू लागले. कायद्याने स्त्रियांवरील अत्याचार थांबत नाहीत पण त्याहीपेक्षा महत्वाचे असे की, समाजात एकप्रकारचा धाक निर्माण होतो व लोक प्रगतीशील दृष्टीने वागतात. तेच शाहू महाराजांचे अंतिम उदिष्ट होते.

**समारोप :**

राजर्षी शाहू महाराज हे दूरदृष्टीचे समाज सुधारक होते. त्यांनी महात्मा फुले याचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणला. डॉ. जयसिंग पवार म्हणतात, कुटुंबामध्ये होणार्या विविध प्रकारच्या क्रूर छळातून असाह्य स्त्रीची सुटका करावी अथवा देवदासी सारख्या अनिष्ट व रानटी प्रथेपासून तिची मुक्तता करावी हा विचार घेऊन स्वातंत्तोतर काळात बर्याच उशिरा चळवळी सुरू झाल्या आहेत. या पाश्र्वभूमीवर शंभर वर्षापूर्वी या राजाने अशा स्त्रियांच्या उद्धाराचा विचार मनात आणला व त्यानुसार कृती करावी ही घटना मोठी लक्षणीय मानवी लागेल.[१९] कोल्हापूर संस्थांनातील राजर्षी शाहू छत्रपतींनी केलेल्या विविध सुधारणामध्ये स्त्रीयांच्या सुधारणांना विशेष

ISSN No. 2394-5990

महत्व आहे. कारण राजर्षी शाहू महाराजांनी सरंजामशाही समाजात कालबाह्य रूढी विरूध दुहेरी लढे दिले. हा लढा एका बाजूने स्वकीयाविरुद्ध होता तर दुसर्या बाजूने हा लढा सनातनी परंपरांच्या विरूद्ध होता. त्याने सत्यशोधक चळवळ आणि आर्य समाजाची चळवळ या दोहोतील चांगल्या गोष्टी घेतल्या आणि स्त्रियांच्या शिक्षणास उचलून धरले. एका बाजूला कायदे केले व दुसर्या बाजूला सामाजिक मन घडविण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांच्या जीवनात अंतर्गत व बाह्य संकटाशी लढताना आधुनिक प्रगत विचारांची मूल्य जाणीव हीच खर्या अर्थाने भक्कम बैठक होती. शाहू महाराज हे लोकराजा होते आणि या लोकराजाने घेतलेले निर्णय ही समर्थ प्रशासकाचे निर्णय होते. भारतीय समाजाच्या सूक्ष्म अभ्यासातून त्यांनी काढलेली ही सूत्रे होती. त्यांच्या शैक्षणिक चळवळीत स्त्रियांच्या शिक्षणाला विशेष महत्व होते, त्यांच्या स्त्री सुधारणावर सत्यशोधक समाज व आर्य समाजाचा संस्कार होता. सामाजिक विषमतेशी लढा देताना त्यांनी केलेल्या चळवळी या नवे विचारपीठ निर्माण करणार्या होत्या. धर्मनिरपेक्ष राज्यात स्त्री व पुरुष हे समान आहेत आणि स्त्रियांचा विकास झाला तरच समाजाची सर्वांगीण प्रगती होऊ शकेल हे त्यांनी ओळखले होते. तोच त्यांच्या सामाजिक सुधारणा कार्याचा पाया होता.

**संदर्भ :**


१) पवार जयसिंगराव, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००७ पृ.११२

२) जोन्सन एम, हरी, सोसालॉजी : अ सिस्ट्यामेटिक इंट्रोडक्षण, अलाईड पब्लिशर्स प्रा.लि., नवी दिल्ली, २००७ पृ.६३३

३) कित्ता पृ.६३३

४) कित्ता पृ.६३३

५) पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०१२ पृ.९१

६) राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, पृ.४८-४९

७) कित्ता पृ.४९

८) डॉ.पवार जयसिंगराव, उपरोक्त, पृ.११३

९) कित्ता पृ.११३

१०) कित्ता पृ.११४

११) डॉ.जयसिंगराव उपरोक्त पृ.९३

१२) कित्ता पृ.९३

१३) डॉ. जयसिंगराव उपरोक्त पृ.११५

१४) करवीर सांस्थान गॅझेटियर भाग ४, २ ऑगस्ट १९१९, पृ.४२-४३

१५) डॉ. जयसिंगराव उपरोक्त पृ.११५

१६) करवीर सांस्थान गॅझेट, १७ जानेवारी १९२०, पृ.३

१७) पवार जयसिंगराव, उपरोक्त पृ.१२३

१८) करविर संस्थान गॅझेट, १७ जानेवारी १९२०, पृ.११६

१९) कित्ता पृ.११६


■■■